INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 11 | DECEMBER - 2022

# ओळख मानवी हक्कांची

डॉ. सचिन गौतम इंगळे[1] , डॉ. पुष्पांजली सचिन इंगळे[2]
[1]सहाय्यक प्राध्यापक, एस.एस.ए. कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर.
[2]सहाय्यक प्राध्यापक (एम.एड.विभाग) कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर.




हक्काच्या संदर्भात ज्यावेळेस आपण बोलतो त्यावेळेस आपल्या लक्षात येतं या पाठीमागे खूप मोठा एक मानवी इतिहास आहे. तो समजून घेणे खूप महत्वाचे आहे; म्हणजेच मानवाच्या प्रोगेतीहासिक काळापासून हक्क या संकल्पनेचे संकेत मिळतात. आपल्याला माहित असलेल्या इतिहासातील मानवी हक्क विषयी सर्वात जुना संदर्भ हा इ.स. पूर्व 2350 लगाश मधील एरुक्कागिना सुधारणा हा आहे. त्यानंतर नवसुमेरियन संस्कृतीतील उरूचा राजा उरनमू याने इ.स.पूर्व 2050 मध्ये स्थापन केलेली कायदे संहिता इ.स.पूर्व 1780 मेसोपोटामियातील हम्मुराबीच्या आचारसंहिता तसेच इ.स.पूर्व 6 व्या शतकात पर्शियन साम्राज्यातील मानवी हक्क विषयक तत्वे अंतर्भूत करण्यात आली. इ.स. पूर्व 539 मध्ये पर्शियन इराण सम्राट सायरस ज्याने ब्येबीलॉन वर विजय मिळविल्यानंतर त्याने सायरस वृत्तचिती प्रसिद्ध केली. ती 1879 मध्ये शोधून काढण्यात आली. आज ही त्या वृत्तचितीस मानवी हक्काचा पहिला दस्तावेज म्हणून ओळखले जाते.

विशेष म्हणजे यामध्ये राज्यातील नागरिकांना आपल्या धार्मिक उपासना व परंपरेची उपासना करण्यास राजाने परवानगी देण्यात येईल असे या वृत्तचितीमध्ये सांगण्यात आले आहे.आणि या वृत्तचितीने गुलामगिरी देखील नष्ट केली आहे; याचाही संदर्भ आढळतो.

त्यानंतर इस पूर्व 539 ते 483 या काळात स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचा आदर्श तथागत गौतम बुद्ध यांनी समस्त जगाला दिला.

इ.स. पूर्व तिसऱ्या शतकामध्ये कलिंग युद्धामुळे सम्राट अशोकाच्या धोरणामध्ये मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले व मानवी हक्काची पायाभूत तत्वे निर्माण करण्यात आली.

आधुनिक काळाच्या सुरुवातीस इंग्लंडचा राजा जॉन याने 15 जून 1215 रोजी जाहीर केलेल्या मॅग्ना चार्ट यामध्ये काहींचे नैसर्गिक अधिकार मान्य करण्यात आले. त्यानंतर 1628 ला पिटीशन ऑफ राइट्स आणि 1689 ला बिल ऑफ राइट्स मध्ये नैसर्गिक अधिकारांचे रूपांतर दैवी अधिकारात झाले.

सर्वात महत्त्वाच्या घटना घडल्या त्या 18 व्या शतकामध्ये त्यामध्ये 1779 ची अमेरिकन हक्काची सनद या मध्ये दैवी अधिकाराचे रूपांतर कायदेशीर अधिकारात करण्यात आले. त्यानंतरच्या 1789 ची फ्रेंच राज्यक्रांती व 1917 च्या रशियन राज्यक्रांतीमुळे जगाला नागरी स्वातंत्र्य प्राप्त झाले.

19 व्या शतकामध्ये झालेली दोन महायुद्ध त्याच्यामध्ये झालेला रक्तपात, लाखो सैनिकांचा गेलेला बळी तसेच निष्पाप लोकांचे गेलेले जीव युद्ध कालावधी दरम्यान मित्र व शत्रू राष्ट्रांनी वापरण्यात आलेली विनाशक शस्त्रे आणि मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये झालेली वित्तहानी, शांततेचा झालेला भंग महिला वरील अत्याचार व निष्पाप बालकांचा गेलेला जीव.

या वरील सर्व घटकांचा ज्यावेळेस आपण सर्वांगाने आढावा घेतो व सखोल अभ्यास करतो त्यावेळेस आपल्याला अंतिमतः 1945 झाली नवयुगात जगाने टाकलेले पाऊल म्हणजेच संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना आणि याच संयुक्त राष्ट्र संघाने 10 डिसेंबर 1948 या दिवशी मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. तिथूनच सर्व जगाने मान्य केले की मानवाला जन्मताच व निसर्गतःच हक्क असतात याच कारणामुळे 10 डिसेंबर हा दिवस संपूर्ण जगामध्ये मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो.

**मानवी हक्काची संकल्पना....**

मानवी हक्काच्या संकल्पनेचा विचार करत असल्यास वेगवेगळ्या युगातील विविध शतकामध्ये मानवी हक्कांना मान्यता देण्यात आली.

या मानवी हक्क संकल्पनेचा मूलतः उदय हा गुलामगिरी विरोधी चळवळ आणि युद्धासंबंधीच्या गुन्ह्याविरुद्ध चळवळी यासारख्या विविध चळवळी मधून निर्माण झाला आहे. त्यामध्ये मनुष्य व बाल कामगार, समस्त सर्व मानवी हक्क बाबतच्या संवेदनांची अवहेलना जातीय गुन्हे व महिला वरील अत्याचार अन्याय या बाबीचा विचार विमर्श अधिक पद्धतीने केलेला आहे.

या सर्व बाबींचा आढावा घेत असताना आपणास सर्व प्रथम मानवी हक्क या संकल्पनेची ओळख ही हेनरी डेव्हिड थोरो या विचारवंताने आपल्या डिसओबीडीयन्स या ग्रंथात करून दिली आहे. तेव्हापासूनच मानवी हक्क हा शब्द जागतिक पातळीवर प्रचलित झाला आहे. मानवी हक्काचा जनक म्हणून ग्रीक तत्वेता सेंट थॉमस आक्वायन्स यांना संबोधले जाते. शिवाय जॉन लॉक यांनी नैसर्गिक हक्काची संकल्पना मांडली म्हणून त्यांना नैसर्गिक हक्काचा जनक असेही म्हणतात; तसेच त्यांना मानवी अधिकार चळवळीचा पिता म्हणूनही ओळखले जाते. शेवटी त्यांनी असे म्हटले की, एखादी व्यक्ती मनुष्य आहे या एक मात्र कारणामुळे तिला मिळणारी शक्ती म्हणजे मानवी हक्क होय.

विविध ऐतिहासिक बाबींचा आढावा व विचारवंतांची मते जाणून घेतल्यानंतर एक बाब समोर आली. ती म्हणजे हक्कांचे विधायक 1776 रोजी मांडण्यात आले. व्हर्जिनिया जाहीरनामेने हक्कांच्या विधेयकामध्ये ठासून सांगितले की, सर्व मानव स्वभावतः समानरित्या मुक्त आणि स्वतंत्र असतात ; त्यांना काही मूलभूत हक्क वारशाने प्राप्त झालेले असतात. तसेच यामध्ये वेळोवेळी सुधारणा करून जनतेच्या मूलभूत स्वातंत्र्याचे वर्णन करण्यात आले. ते म्हणजे की, राज्यांना हक्काचे उल्लंघन करण्यास मनाई करण्यात आली प्रत्येक व्यक्तीस अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आणि भाषण व वृत्तपत्र स्वातंत्र्य तसेच सभेच्या हक्कांचे स्वातंत्र्य इत्यादींची हमी विधेयकाद्वारे करण्यात आली. राज्य त्यांच्या पासून हे हक्क हिरावून घेऊ शकत नाही. सरते शेवटी जनतेने शासनास मर्यादित सत्ता सोपविली त्याचे मुख्य कारण सर्व मानवी समूहाचे हक्क अबाधित राहावे.

प्रसिद्ध राजकीय विचारवंत हेरॉल्ड लास्की यांच्या मते, ज्या परिस्थितीच्या घटकांशिवाय व्यक्तीला आपली सर्वांगीण प्रगती साध्य करता येत नाही त्या परिस्थितीच्या घटकांना मानवी अधिकार असे म्हणतात.
ज्यावेळेस आपण मानवी हक्काचे स्वरूप अभ्यासतो त्यावेळेस लक्षात येते की; व्यक्तीची मागणी ही न्याय तर्कसंगत निस्वार्थी, ती मागणी न्याय व सार्वत्रिक स्वरूपाची असेल तर त्यास समाजाची व राज्याची मान्यता मिळते.

शिवाय कोणतेही अधिकार अमर्यादित नसतात ते मर्यादित स्वरूपाचे असतात. काही वेळेस समाजातील ठराविक लोकांना मिळणारे अधिकार विशेष अधिकार असतात आणि ते इतरांना जुलूम करणारे असतात. लोकशाही व्यवस्थेमुळे विशेष अधिकार मोडीत व संविधानिक अधिकार निर्माण झाले.

यावरून असे लक्षात येते की हक्कांचे स्वरूप हे तीन प्रकारे मांडता येते

- अविभाज्य हक्क
- वैश्विक हक्क
- परस्परावलंबी हक्क.

मानवी हक्काचे वर्गीकरण विविध काळात झालेल्या त्यांच्या विकासातून चार प्रकारे वर्गीकृत करण्यात येते.

- नकारात्मक आणि सकारात्मक हक्क.
  केराल वसाक याने मानवी हक्काचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.
- पहिल्या पिढीचे मानवी हक्क ज्यामध्ये नागरी हक्क आणि राजकीय हक्क यांचा समावेश करण्यात आला आहे.
- दुसऱ्या पिढीचे मानवी हक्क ज्यामध्ये आर्थिक सामाजिक सांस्कृतिक हक्क यांचा समावेश करण्यात आला आहे.
- तिसऱ्या पिढीचे हक्क ज्यामध्ये वैयक्तिक हक्क व सामूहिक हक्क यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

यामुळेच मानवी हक्काच्या संरक्षणाची गरज व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी, दुर्बल घटकांचे कल्याण व संरक्षण करण्यासाठी, व्यक्तीला न्यायालयीन संरक्षण प्राप्त होण्यासाठी, तसेच त्या व्यक्तीचे वैयक्तिक स्वातंत्र्य व शारीरिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक हे सर्व मानवी हक्क अबाधित राहण्यासाठी अत्यंत गरजेचे आहेत.

ज्या ज्या वेळेस आपण मानवी हक्कांचे आकलन करतो त्यावेळेस ते तीन पातळ्यावर होते त्यामध्ये

- मानवी मूल्य
- राजकारण
- कायदा

मुख्यतः आपण मानवी हक्कांच्या घटकाचा अभ्यास करतो त्यावेळेस आपल्याला लक्षात येते की ते पाच घटकांमध्ये मांडता येतात.

- हक्क धारण करणारा अथवा हक्कधारक, ज्याला हक्क आहेत असा तो.
- कोणते हक्क म्हणजे हक्काचा विषय अथवा हेतू.
- असे हक्क जे एखादी व्यक्ती मागू शकते, त्यासाठी दावा करू शकते, त्यांचा उपभोग घेऊ शकते किंवा अंमलात आणते म्हणजेच हक्कांचा वापर.
- अशा हक्कांच्या दाव्यासाठीचा आधार म्हणजेच हक्कांचे समर्थन.

मानवी हक्काचे उल्लंघन झाले तर त्याचा परिणाम त्या व्यक्ती समाज आणि राष्ट्राला भोगावा लागतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या मानवी हक्काचे संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. संरक्षण करण्यास शासन अपयशी ठरले तर मानवी हक्काचे उल्लंघन होते. सरकारचे सर्व प्रतिनिधी हे मानवी हक्काचे संरक्षण करतात. मानवी हक्काची तक्रार एखाद्या व्यक्तीविरुद्ध अथवा सरकारच्या विरोधात केली जाते. पीडित व्यक्ती सरकारकडे दाद मागते.

काही उदाहरणाद्वारे आपण मानवी हक्क भंगाची उदाहरणे ही अभ्यासू शकतो त्यामध्ये..

- विषारी वायु लोकांच्या घरात किंवा शेतात गेल्यास त्याचा अटकावा करण्यात कारखाना अपयशी ठरल्यास; जीवितांच्या अधिकारांची उल्लंघन होते.

- पोलिसांनी आरोपींना मारणे व दाबून ठेवणे छळ करणे; हे शारीरिक सुरक्षिततेचे मानवी हक्क व प्रतिष्ठेचे उल्लंघन आहे.
- तुरुंग अधिकाऱ्या विरुद्ध महिला कायद्याने केलेल्या चळवणुकीच्या तक्रारीबाबत न्यायाधीशांनी कोणतीही कारवाई न करणे हे; समान संरक्षणाच्या हक्काचे उल्लंघन आहे.
- सुरक्षा दलाने संरक्षणाच्या कार्यासाठी एखाद्या व्यक्तीचे दुकान त्याचा मोबदला न देता वापरणे हे; उपजीविकेच्या हक्काचे उल्लंघन आहे.
- जिल्हा प्रशासनाने पूर नियंत्रणासाठी काय उपाययोजना केली याची माहिती न देणे हे; माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्काच्या बाबत विविध अभ्यासद्वारे मानवी हक्क असुरक्षित गट निश्चित केले.

त्यामध्ये...

- **स्त्रिया :-**

**राष्ट्रसंघाच्या आमसभेने**

7 नोव्हेंबर 1967 रोजी स्त्रिया विरुद्ध होणाऱ्या भेदभावाला विरोध करणारा जाहीरनामा स्वीकारला आणि त्यातील तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी स्त्रिया विरुद्ध होणाऱ्या सर्व भेदभावांचे समूळ उच्चाटन करणारा करारनामा स्वीकारला. स्त्रियांवर मुख्यतः भेदभाव हा त्यांच्या शिक्षणावरून, रोजगार प्राप्तीवरून, आरोग्य सेवा प्राप्तीवरून आणि आर्थिक व सामाजिक जीवन आणि कायद्यासमोर समानता या बाबींचा समावेश करण्यात.

- **बालके :-**

2 सप्टेंबर 1990 रोजी बालकांच्या हक्काचा जाहीरनामा स्वीकारण्यात आला. यामध्ये 54 कलमे आहेत या जाहीरनाम्याचा मुख्य हेतू बालकाच्या जीविताचे हक्क, राष्ट्रीयत्वाचा हक्क, बालमजुरांच्या शोषणाविरुद्ध हक्क, कौटुंबिक हक्क, कौटुंबिक वातावरणाचा हक्क आणि शिक्षणाचा हक्क इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

- **स्थलांतरित कामगार :-**

18 डिसेंबर 1990 रोजी सर्व स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांचे हक्क संरक्षित करणारा आंतरराष्ट्रीय करारनामा पारित केला. कोणतेही कामगार राज्य त्यांचे जन्मतः असलेले राज्य कोणत्याही बंधनाशिवाय सोडण्याचा किंवा पुन्हा प्रवेश करण्याचा व राहण्याचा अधिकार कायद्याखाली जीविताच्या हक्काची जपणूक छळ, अपमानित किंवा क्रूर वागणूक व शिक्षेपासून रक्षण, गुलामगिरी किंवा दास्यतत्त्वापासून रक्षण, जुलमांनी मालमत्ता हिरावली जाण्यापासून संरक्षण इत्यादी विषय या करारनाम्यामध्ये मांडलेले आहेत.

- **कैदी :-**

आंतरराष्ट्रीय नागरी व राजकीय हक्कांचा जाहीरनामा आणि बाल हक्क जाहीरनाम्यात कैद्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीविषयी बाबतच्या तरतुदी दिल्या आहेत. या करारनाम्यातील दहाव्या कलमात नमूद केले आहे की, फिर्यादी आणि गुन्हेगारी यांच्यात फरक केला पाहिजे व फिर्यादीला गुन्हेगारापासून वेगळे ठेवले गेले पाहिजे. कारण व्यक्तींना

मानवतेने व मानवी सन्मानाने वागणूक दिली गेली पाहिजे. कोणतीही व्यक्ती जन्मतः प्राप्त असलेल्या मानवी प्रतिष्ठेचेतेही हक्कदार आहेत.

- **निर्वासित लोक :-**

मानवी हक्काच्या जाहीरनाम्यामध्ये कलम 15 नुसार अशी तरतूद आहे की, माणसाला राष्ट्रीयत्वाचा हक्क आहे आणि तो विनाकारण किंवा बळजबरीने हिरावून घेता येणार नाही. निर्वासित लोकांच्या सामाजिक दर्जाला न्यायालयीन दर्जा देऊन त्यांचे निर्वासित्व रद्द करतो.

- **अपंग व्यक्ती :-**

अपंग हा शब्द जगातील मानसिक व शारीरिक अपंगत्व असलेल्या लोकांसाठी वापरला जातो. या व्यक्तींना मूलभूत शिक्षणापासून वंचित ठेवू नये. त्यांना त्यांचे जीवन सुयोग्य पद्धतीने जगण्या साठी पैसे प्राप्त करण्याचा व काम मिळविण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. शारीरिक आणि मानसिक अपंगत्व आल्याकारणाने हा व्यक्तीसमूह सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाच्या प्रवाहापासून ते दूर फेकले जातात. म्हणून त्यांचा जीवन सन्मान होण्यासाठी मानसिक अपंगत्व जाहीरनामा 1979 आणि अपंग व्यक्तीचा हक्कांचा जाहीरनामा 1975 रोजी स्वीकारण्यात आला.

- **मूळ वंशीय लोक :-**

बाहेरून येऊन स्थायिक झालेल्या लोकांच्या आधीपासून त्या भूमीवर राहणारे लोक म्हणजे मूळ वंशय लोक त्यांना आदिवासी किंवा मूळ निवासी असे म्हणतात. यांना जाहीरनाम्याने आदिवासी लोकांच्या हक्काचे रक्षण आणि पुरस्कार करणे महत्त्वाचे मानले आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने स्वतंत्र राष्ट्रातील मूळ वंशीय आणि आदिवासी लोकांशी संबंधित करारनामा स्वीकारला आणि त्याची अंमलबजावणी 1991 मध्ये सुरू करण्यात आणली.

- **वृद्ध व्यक्ती :-**

1991 च्या संयुक्त राष्ट्र सभेच्या आमसभेने एक ठराव स्वीकारला. ज्यामध्ये वृद्धांकरिता 18 तत्वे देण्यात आली. ही तत्वे वृद्धांचे स्वातंत्र्य सहभाग काळजी स्वयंपूर्णता आणि सन्मानाची निगडित आहेत.

एप्रिल 2002 मध्ये मद्रिद येथे झालेली दुसरी जागतिक वार्धक्य महासभा ही वृद्धांच्या हक्काबाबतची नजीकच्या काळातील प्रगती आहे.

संपूर्ण जगभरात वृद्ध लोकांना अनेक वृद्ध अवस्थेमुळे विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते उदाहरणार्थ शारीरिक दुर्बलता, अपुरे पैसे खालावत जाणारे आरोग्य या काही प्रमुख अडचणी आहेत.

शिवाय वेगाने होणारे शहरीकरण आणि इतर कारणांमुळे कुटुंब व्यवस्था ही भंग पावते आहे. आणि वृद्धांची काळजी घेणारे कौटुंबिक वातावरण या विविध कारणांमुळे वृद्ध व्यक्तींचे संगोपन, पालन व पोषण करणे ही एक गंभीर समस्या सद्यस्थितीला निर्माण झालेली आपणास दिसून येते. वृद्धांचा सन्मान केला पाहिजे हे तत्व सर्व मान्य करण्यात आलेले आहे.

- **राष्ट्रीय अथवा वंशिक धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांक लोक :-**

नागरी आणि राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील कलम 27 मध्ये धार्मिक, वंशिक भाषिक आणि राष्ट्रीय अल्पसंख्यांकाचे सांस्कृतिक धार्मिक आणि भाषिक हक्क कोणी ही हिरावून घेऊ शकत नाही असे सांगितले आहे. 1992 साली संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने राष्ट्रीय अथवा धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक लोकांच्या हक्कांचा

जाहीरनामा स्वीकारला. आणि सर्व अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संवर्धन आणि संरक्षण झाल्यास ते राहत असलेल्या देशात राजकीय आणि सामाजिक स्थैर्य लाभण्यास हातभार लागतो असे मानण्यात आले आहे.

आतापर्यंत आपण मानवी हक्क कोण उपभोक्ता ते पाहिले मात्र हक्क देण्यास आणि त्याचे संरक्षण करण्यास कोण जबाबदार आहे म्हणजे हे कर्तव्य कोण पार पडते हेही लक्षात घेणे गरजेचे आहे.

**यामध्ये...**

- **राज्य आणि सरकारी यंत्रणा :-**

देशातील नागरिकांच्या हक्काचे संरक्षण करणे ही मुख्यतः शासनाची जबाबदारी आहे म्हणजे देशाचे नागरिक कोणत्याही अडथळ्याशिवाय हे हक्क उपभोग शकतील यांची हमी देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. यात जर शासन अयशस्वी झाले तर ते मानवी हक्कांचे उल्लंघन समजले जाते. शासनाचे सर्व प्रतिनिधी हे व्यक्तीचे हक्क रक्षणासाठी जबाबदार व कर्तव्य बजावत  असतात. म्हणजेच मानवी हक्क हे राष्ट्राकडे मागता येतात. एखाद्या व्यक्तीकडे ते नाही. शासन व शासन प्रतिनिधी द्वारे मानवी हक्काचे उल्लंघन झाले; तर ते न्यायमंडळाकडून त्या व्यक्तीचे हक्क पुनर्स्थापित करता येतात.

- **कंपनी आणि इतर संस्था :-**

व्यक्तीच्या मानवी हक्काचे संरक्षण करण्याचे कर्तव्य औद्योगिक क्षेत्र आणि इतर संस्था जसे की; शैक्षणिक सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक संस्था या सर्वांचे असते. उदाहरणादाखल कामगारांचे हक्क यामध्ये कामगारांना समान कामासाठी समान वेतन, आरामाचा हक्क व स्त्रियांना प्राप्त होणारे विविध हक्क.

- **समाज :-**

अनेक समाजामध्ये मानवी रूढी आणि प्रथा अजूनही पाळल्या जातात त्या विशेषतः जात आणि धर्मावर आधारित असतात. समाजाची ही जबाबदारी आहे की, त्यांनी मानवी हक्कांना समृद्ध करून समाजाअंतर्गत बदल घडविला पाहिजे. व्यक्तीने स्वतःचे हक्क जपताना समाजाने इतर समूहातील लोकांच्या सामाजिक हक्काचा आदर राखला पाहिजे. मानवी हक्काचे संरक्षण व संवर्धन आणि पुरस्कार करण्यासाठी विविध सामाजिक गट तयार करता येतील व त्याद्वारे हक्काबाबतची जाणीव जागृती निर्माण करता येऊ शकेल.

- **व्यक्ती :-**

स्वतःचे मानवी हक्क उपभोगणाऱ्या सर्व व्यक्तींनी इतरांच्या मानवी हक्क संरक्षणाबद्दल ही कर्तव्यदक्ष असावे याचा अर्थ हक्कांची वाहक असलेली प्रत्येक व्यक्ती ही कर्तव्याची सुद्धा वाहक असते.

या संपूर्ण ऐतिहासिक आढावा नंतर व मानवी हक्काला आवश्यक असलेल्या माहितीचा आढावा घेतल्यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने जो जागतिक मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध केला त्याची ओळख होणे क्रमप्राप्त आहे.

**मानवी हक्काचा जागतिक जाहीरनामा :-**

10 डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या साधारण सभेने मानवी अधिकारांचा जागतिक जाहीरनामा संमत करून घोषित केला.

**मानवी हक्क जाहीरनाम्याचा हेतू :-**

- सर्व व्यक्तींची स्वाभाविक प्रतिष्ठा व त्यांचे समान व अहस्तांतरय अधिकार यांना मान्यता देणे.
- जगात स्वातंत्र्य न्याय व शांतता यांच्या प्रस्थापनेचा पाया निर्माण करणे.
- मानवी अधिकाराची अवहेलना व अप्रतिष्ठा झाल्याने अमानुष कृत्य घडून आली आणि त्यायोगे मानव जातीच्या सदसदविवेक बुद्धीवर भयंकर आघात झाला. म्हणून सर्व मानवांना भाषण स्वातंत्र्याचा व श्रद्धा स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचे वातावरण निर्माण करणे.
- जुलूम व दडपशाही या विरुद्ध मानवाला बंड करणे भाग पडले त्यातूनच मानवी अधिकारांचे संरक्षण करणे.
- राष्ट्र राष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे संबंध वृद्धिंगत करण्याच्या कार्यास चालना देणे.
- मूलभूत मानवी अधिकार मानवाची प्रतिष्ठा, महत्त्व व स्त्री पुरुषांचे समान अधिकार यावरील श्रद्धा निश्चयपूर्वक पुन्हा निर्माण करणे आणि अधिकाधिक स्वातंत्र्याच्या वातावरणात सामाजिक प्रगती घडून आणण्याचा व जीवनमान सुधारण्याचा निर्धार करणे.

मानवी हक्काच्या जाहीरनामा मध्ये एकूण 30 कलमे दिलेली आहेत. आपल्या सर्वांच्या अभ्यास सोयीसाठी आपण त्यांना तीन भागांमध्ये रूपांतरित करू शकतो.

- **भाग पहिला मानवी हक्कांचे आश्वासन**

कलम 1 हक्कामध्ये आणि प्रतिष्ठित स्वातंत्र्य आणि समानतेचा हक्क.
कलम 2 सापेक्षते पासून मुक्ती.

- **भाग दुसरा मानवी हक्कांच्या सनदी मधील नागरी व राजकीय हक्क.**

कलम 3 व्यक्तीला जीवन, मोकळीक आणि सुरक्षेचा हक्क.
कलम 4 गुलामगिरी व दहशतवापासून स्वातंत्र्य.
कलम 5 छळवणूक किंवा मानहानिकारक वागणुकीपासून स्वातंत्र्य.
कलम 6 कायद्यासमोर एक व्यक्ती म्हणून अधिकृत मान्यतेचा हक्क.
कलम 7 कायद्यासमोर एकसमान योग्यतेचा हक्क.
कलम 8 कार्यक्षम न्याय सभेमार्फत उपाय मिळविण्याचा हक्क.
कलम 9 जुलमी कैद किंवा हद्दपारपासून स्वातंत्र्य
कलम 10 न्याय सुनावणी किंवा सार्वजनिक सुनावणीचा हक्क
कलम 11 दोष सिद्ध होईपर्यंत निरपराध मानले जाण्याचा हक्क.
कलम 12 एकांतात ढवळाढवळ करण्यापासून स्वातंत्र्य यात घर, कुटुंब व पत्रव्यवहार यांचा समावेश आहे.
कलम 13 हालचालीच्या स्वातंत्र्याचा हक्क आणि स्वतःच्या देशात घर असण्याचा आणि हवे तेव्हा येण्या जाण्याचा हक्क.
कलम 14 सुरक्षित आश्रयस्थानाचा हक्क.
कलम 15 राष्ट्रीयत्वाचा हक्क आणि ते बदलण्याचे स्वातंत्र्य.
कलम 16 विवाह व कुटुंबाच्या संरक्षणाचा हक्क.
कलम 17 मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क.
कलम 18 श्रद्धा आणि धर्मासंबंधीत स्वातंत्र्याचा हक्क.

कलम 19 अभिप्राय आणि माहितीच्या स्वातंत्र्याचा हक्क.
कलम 20 शांततापूर्ण सभा आणि संगतीचा हक्क.
कलम 21 शासनात आणि मुक्त मतदानात सहभागी होण्याचा हक्क तसेच सार्वजनिक सेवेला समान सवलती.
भाग तिसरा मानवी हक्कांचा सनदीतील आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक हक्क.
कलम 22 सामाजिक सुरक्षिततेचा हक्क.
कलम 23 काम करण्याचा व न्याय वेतन मिळविण्याचा हक्क.
कलम 24 विश्रांती आणि फुरसती हक्क
कलम 25 आरोग्य व सद्यस्थितीसाठी पुरेशा राहणीमानाचा हक्क.
कलम 26 शिक्षण प्राप्तीचा हक्क.
कलम 27 जमातीच्या सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क.
कलम 28 मानवी हक्कांची हमी देणाऱ्या सामाजिक सुव्यवस्थेचा हक्क.
कलम 29 व्यक्तीच्या संपूर्ण व स्वतंत्र व्यक्तिगत विकासासाठी आवश्यकता.
कलम 30 राज्यापासून स्वातंत्र्य किंवा वरीलपैकी कोणत्याही हक्कांमधील ढवळा ढवळीपासून स्वातंत्र्य.

- **या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यानंतर**

3 जानेवारी 1976 रोजी नागरी व राजकीय हक्कांचा समावेश करण्यात आला.

- **आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक**

हक्काकरिता 23 मार्च 1976 रोजी या हक्कांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली.

- **मानवी हक्काचा जाहीरनामा व भारतीय राज्यघटना..**

भारताची राज्यघटना लिहिण्यास सुरुवात झाल्यानंतर दोन वर्षांनी मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा स्वीकारण्यात आला. तथापि 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताच्या घटना समितीने जागतिक जाहीरनामा स्वीकारला. त्यातील प्रत्येक कलमाचे प्रतिबिंब भारताच्या राज्यघटनेत आणि कायद्यात दिसते.

विशेषता ज्यावेळेस आपण मानवी हक्काच्या जागतिक जाहीरनामाचा अभ्यास करतो; त्यावेळेस भारतीय राज्यघटनेतील प्रकरण क्रमांक तीन मूलभूत अधिकार आणि आणि प्रकरण क्रमांक चार राज्याची निती निर्देशक तत्वे आणि काही भारतीय राज्यघटनेतील विशिष्ट अशी कलमे ही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मानवी अधिकारावर प्रभाव टाकताना दिसून येतात.

**भारतातील मानवी हक्क जबाबदाऱ्या यंत्रणा अंमलबजावणी व संरक्षण.**

Universal Declaration of Human Right Convention म्हणजेच जागतिक मानवी हक्क जाहीरनाम्याच्या सनदे मुळे आणि भारतीय राज्यघटनेला अनुसरून संसदेने सन 1993 मध्ये मानवी हक्क संरक्षण कायदा पारित केला. या कायद्याद्वारे मानवी हक्क संरक्षणासाठी तीन स्तरीय रचना करण्यात आली आहे.

मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 या कायद्यामध्ये प्रकरण क्रमांक दोन मधील कलम क्रमांक तीन मध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेची तरतूद केली.

तसेच मानवी हक्क संरक्षण कायद्यातील कलम क्रमांक 21 नुसार प्रत्येक राज्याला आपल्या राज्यातील जनतेच्या मानवी हक्काचे संरक्षण करण्याकरिता आयोग स्थापन करता येईल असे मांडण्यात आले आहे.

अंतिम या कायद्यानुसार प्रकरण सहा मधील कलम क्रमांक 30 नुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे; मात्र हे स्थापन करताना उच्च न्यायालयाच्या संमतीने ती स्थापित करावी. एक सुदृढ, वैचारिक, सर्वसमावेशक व भविष्यकालीन मानव जातीची पिढी निर्माण करायची असेल तर आपण सर्वांनी आजच्या परिस्थितीला मानवी अधिकार समजून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सर्वे भवन्तु सुखीन..
बहुजन हिताय बहुजन सुखाय..

### संदर्भसूची.

1) Humane Right and Education 2012 Jain.
2) Human Right and Education 2010 Agrawal.
3) मानव अधिकार आणि शिक्षण यासंबंधीची विविध व्याख्याने न्यायमूर्ती घोरपडे.
4) डी.डी. बसू 2012,भारतीय संविधान.
5) एम. लक्ष्मीकांत 2014, भारतीय संविधान व प्रशासन